संशोधन आराखडा

‘नांदेड व परभणी जिल्ह्यातील पायाभूत (आधारभूत) सुविधांच्या उपलब्धतेचा तुलनात्मक अभ्यास २०१०-११ ते २०२२-२३’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी

सादर करावयाचा संशोधन आराखडा

* संशोधक *

अश्विनी दात्ताहारी कदम

एम्.ए. (अर्थशास्त्र)

* मार्गदर्शक *

डॉ. विजय एन. भोपाळे

प्राध्यापक, अर्थशास्त्र विभागप्रमुख

स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा (जं) जि. परभणी.

ऑगस्ट - २०२३

‘नांदेड व परभणी जिल्ह्यांतील पायाभूत (आधारभूत) सुविधांच्या उपलब्धतेचा तुलनात्मक अभ्यास २०११ ते २०२२-२३’

प्रस्तावना :

कोणत्याही देशाचा विकास करण्यासाठी पायाभूत सुविधांची गरज असते. देशाची आर्थिक व सामाजिक प्रगती पायाभूत सुविधांवर अवलंबून असते. भारत हा देश कृषीप्रधान देश आहे. बहुतांश लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे. कृषी क्षेत्राच्या जलद विकासासाठी शेती क्षेत्रातील उत्पन्न जास्तीत जास्त प्रमाणात वाढवायचे असेल तर त्यासाठी आवश्यक वीजपुरवठा, पाणीपुरवठा, रस्ते वाहतूक इत्यादी घटकांची आवश्यकता असते त्याचबरोबर औद्योगिक क्षेत्राचे उत्पादन करण्यासाठी यंत्रसामुग्री व तंत्रज्ञान असून चालत नाही तर कुशल कामगार, वीजपुरवठा, संयोजक, बँकव्यवस्थापन, वीमा यांची सांगड घालावी लागते. याच्या व्यतिरिक्त बाजारपेठ सुविधा, दळणवळण सेवा, रेल्वे, रस्ते, जल व हवाई वाहतूक सुविधांना सामूहिकपणे पायाभूत सुविधा असे म्हणतात. पायाभूत सुविधेला पर्यायी नाव ‘मूलभूत सुविधा’ किंवा ‘आधारभूत संरचना’ म्हणतो. देशाचा आर्थिक विकास करण्यासाठी पायाभूत सुविधांची गरज असते या सेवा जितक्या जलद गतीने प्राप्त होतात, तितक्याच जलद गतीने अर्थव्यवस्थेचा विकास होतो.

सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध झाल्या नाही तर आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो. विकासाचा संबंध फक्त माणसांच्या भौतिक गरजांशी नसतो तर त्यांच्या जीवनाच्या सामाजिक घटकांच्या सुधारण्याबद्दल असतो. विकसनशील राष्ट्रामध्ये पायाभूत सुविधेचा हवा तसा विकास झालेला नाही.

भांडवलाची समस्या, उच्च तंत्रज्ञानाचा आभाव, गरीबी या सर्व घटकांमूळे पायाभूत सुविधांचा विकास झालेला नाही १५०-२०० वर्षांच्या काळामध्ये इंग्लंड या देशात औद्योगिक क्रांती घडून आली त्यावेळी कुशल कामगारांची जागा यंत्रसामुग्री या घटकाने घेतली. याच बरोबर कृषी घटक व दळणवळण, परिवहन क्षेत्रात क्रांती घडून आली. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स हे देश एकेकाळी मागासलेले देश होते. आर्थिक विकासाच्या सुरुवातीच्या काळात या देशांशी पायाभूत सुविधा या घटकावर लक्ष केंद्रित केले होते.

उर्जेचा घटक म्हणून प्रारंभीच्या काळात दगडी कोळसा, त्याचसोबत पाणी, खनिज तेल याचा वापर होत असे. उत्पादन क्षेत्रात तंत्रज्ञान, व्यापार विज्ञान, भांडवल उभारणी करीता बँक, वीमा या वित्तीय घटकांची निर्मिती झाली.

प्रत्येक देशाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पायाभूत सुविधा आवश्यक असतात, पायाभूत सुविधांचा विकास योग्य प्रमाणात झाला नसेल तर ती विकासातील मोठी समस्या असते या आवश्यक सेवा-सुविधांमुळे इंग्लंड देशाची आर्थिक प्रगती झाली. या सर्व घटकांवरून समजते की, पायाभूत सुविधा आर्थिक विकासात महत्त्वाच्या असतात. देशाच्या विकासासाठी आवश्यक असणारे मुलभूत घटक म्हणजे पायाभूत सुविधा. पायाभूत सुविधा देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.

‘पायाभूत सुविधा’ ही खुप व्यापक संकल्पना आहे. विकासाचा दर वाढवायचा असेल तर पायाभूत सुविधांचे स्थान अर्थव्यवस्थेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्षेत्रात महत्त्वाचे आहे.

जगातील अमेरिका, फ्रांस, जापान, रशिया इ. राष्ट्र विकसित राष्ट्र म्हणून ओळखले जातात. या देशांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला असल्याचे सांगता येते.

पायाभूत संरचनेची संकल्पना :

पायाभूत संरचनेलाच मुलभूत सामाजिक गुंतवणूक असे सुद्धा म्हटले जाते. पायाभूत संरचनेत ज्या सुविधांचा समावेश होतो त्यांना भांडवली संपत्तीच्या रूपात ओळखले जाते व त्यावर संपूर्ण समाजाचा अधिकार असतो. संपूर्ण समाज या आधारभूत संरचनेमधील घटकाने लाभान्वित होतो. पायाभूत संरचनेतील घटक प्रत्यक्षपणे वस्तूंचे उत्पादन करत नाहीत, परंतू आर्थिक व्यवहाराची पातळी उंचावण्यासाठी परिस्थितीची अनुकूलता ते निर्माण करतात.

'उत्पादक पक्रियांना अप्रत्यक्षपणे सहाय्यभूत ठरणारे विविध स्वरूपातील समाजीक भांडवलाला पायाभूत संरचना असे म्हणतात.'

पायाभूत संरचनेतील प्रमुख घटक :

१. उर्जा : वीज, कोळसा, खनिज तेल, आणि
अपारंपारिक उर्जा इ.

२. वाहतूक : रस्ते, रेल्वे, जल, हवाई इ.

३. दळणवळण : टपाल, तार, दूरध्वनी

४. अधिकोषण : बँक, वित्त, वीमा

५. सिंचन

६. सामाजिक आधार संरचना : आरोग्य, शिक्षण, पेयजल पुरवठा

७. विज्ञान व तंत्रज्ञान

भारतातील पायाभूत संरचना :

नियोजनाच्या सुरुवातीपासूनच नियोजनकारांनी पायाभूत संरचनेला प्रधान्य दिले. दुसरया पंचवार्षिक योजनेत औद्योगिक क्षेत्राला झुकते माप देऊन औद्योगिकीकरणाचा पाया घातला. सर्वसाधारणपणे पंचवार्षिक योजनेत करण्यात आलेल्या एकूण योजना खर्चाच्या ५० टक्के भाग हा पयाभुत संरचनेच्या विकासावर खर्च करण्यात आला.

सद्यस्थितीत भारतामधील पायाभूत सुविधांची स्थिति ही अतिशय दयनीय आहे. त्यामुळे खेड्यातून शहराकडे स्थालंतरणाचे प्रमाण जास्त आहे. सन १९५१ मध्ये एकूण शहरी लोकसंख्येत वर्ग १ शहरांचा लोकसंख्येचा भाग ४४.६ टक्के होता परंतू सन २०२१ च्या जनगणनेनुसार तो ७७.० टक्के एवढा झाला आहे. सन १९६१ मध्ये शहरी क्षेत्रांची संख्या २७०० होती, ती सन २०२१ च्या जनगणनेनुसार ५१६१ एवढी झाली आहे.

सन २०२१ च्या जनगणनेनुसार दहा लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांची लोकसंख्या ३४ एवढी आहे. भारतीय शहरांच्या वाढीचा दर चीनसह जगातल्या इतर सर्व देशांतील दरापेक्षा अधिक आहे. त्यामूळे शहरातील पायाभूत सुविधा कोलमडून पडल्या आहेत. वाढत्या वाहन संख्येमुळे अतिभाराने रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. रेल्वे, रस्ते, बस स्थानके, सार्वजनिक ठिकाणे येथे प्रचंड गर्दी उसळत आहे. सुमारे २९ टक्के जनता झोपड़पट्ट्या आणि गलिच्छ वस्त्यांमध्ये राहात आहे.

भारताच्या आर्थिक आणि दीर्घकाळ टिकणारया विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास करणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या आर्थिक विकासाचा दर ७ ते ८ टक्के पेक्षा अधिक राखायचा असेल तर जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारणे गरजेचे आहे.भारतीय जनतेचे मनोबल उंचावण्यासाठी ही अत्यावश्यक पाउले आहेत. पायाभूत सुविधा ही काळाची गरज असून त्यासाठी बॉट म्हणजे बिल्ड, ओपरेट एंड ट्रांसफर ही नवी प्रणाली अंमलात आली आहे. पायाभूत विकासाला पूरक अशी एस.पी.व्ही. (स्पेशल पर्पझ वेहिकल) म्हणजेच विशेष उद्देश्य वाहन प्राधिकरण कर्ज पुरवठा करणार आहे, तसेच भारतीय पायाभूत संरचना वित्त कंपनी लिमिटेडची स्थापना करण्यात आली आहे. तसेच शहरी क्षेत्रांचा विकास करण्याकरीता 'जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान' मोहिमेचा शुभारंभ पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांच्या हस्ते दि. ०३ डिसेम्बर २००५ रोजी झाला. या मोहिमेत सात वर्षांत १,२०,५३६ कोटी रुपये खर्चाचे उद्दिष्ट होते. पहिल्या टप्प्यात एकूण ६३ शहरांचा समावेश करण्यात आला होता. या खर्चात केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक संस्थांचे योगदान आहे. गावामध्ये पायाभूत सुविधांच्या विकासाकरीता केंद्र सरकारने महत्त्वाकांक्षी 'भारत निर्माण योजना' या कार्यक्रमाचा शुभारंभ पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी दि. १६ डिसेंबर २००५ रोजी नवी दिल्ली येथे केला.

महाराष्ट्रातील पायाभूत संरचना:

महाराष्ट्र राज्याची निर्मीती १ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्र सुरुवातीपासुनच औद्योगिक विकासात अग्रेसर आहे. त्याचबरोबर महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही शेती क्षेत्रावरच अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्य जागतिक दर्जाच्या आधारभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देत असून सामान संधी व

सामान विकास या सुत्राच्या आधारावर महाराष्ट्राचा विकास होत आहे. राज्याने पायाभूत सुविधा प्राप्त करून देण्याकरीता देश पातळीवर नावलौकिक मिळविला आहे. आर्थिक वृद्धीकरीता आधारभूत सुविधा महत्त्वाची भूमिका बजावतात.

मराठवाड्यातील पायाभूत संरचना :

महाराष्ट्रातील विकासाची विषमता पाहता विकेंद्रीकरण आणि समतोल विकासाकरीता अविकसित विभागात मराठवाडा हा सर्वात कमी विकसित प्रदेश आहे. यादृष्टिने मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये पायाभूत संरचनेचा विकास करणे अत्यंत गरजेचे आहे.

औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली हे आठ जिल्हे एकत्रित होउन मराठवाडा विभाग होतो.

अभ्यास विषयाचे महत्त्व :

स्वातंत्रोत्तर काळात भारतामध्ये शहरीकरणात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. भारतातील शहरी लोकसंख्येची वाढ ही केवळ महानगरांपुरतीच मर्यादित नसून वाढीचा दर हा जिल्हा मुख्यालये, तालुक्याच्या ठिकाणी, पंचायत समित्यांची गावे, नगर पालिका, नगर परिषद क्षेत्र इ. ठिकाणीही जास्त प्रमाणात आहे, लोकसंख्या वृद्धीदरामुळे शहरी क्षेत्रांमध्ये अवास्तव वाढ झाली असल्यामुळे नागरी भागातील पायाभूत सुविधा कोलमडून पडल्या आहेत. भारत सरकारच्या खाजगीकरण, उदारीकरण व जगातिकीकरण या धोरणांचा परिणाम पाहता एका अंदाजानुसार सन २०३१ पर्यंत नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण सुमारे ४० टक्के एवढे होईल तर स्थूल राष्ट्रीय उत्पादनामध्ये नागरी भागाचा हिस्सा सुमारे ६५ टक्के एवढा असेल. आर्थिक प्रक्रिया ह्या उत्पादकतेवर अवलंबून असतात आणि उत्पादकता ही पायाभूत सुविधेच्या

गुणवत्तेवर अवलंबून असते . नागरी आर्थिक प्रक्रिया ह्या वीज, दळणवळण, रस्ते, पेयजल, वाहतूक, घन कचरा व्यवस्थापन इ. सेवा सुविधांवर अवलंबून असतात सन २०३१ पर्यंत स्थूल राष्ट्रीय उत्पादनामध्ये नागरी भागाचा हिस्सा ६५ टक्के पर्यंत वृद्धींगत करावयाचा असेल तर पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे ही पूर्व अट ठरते .

सध्या भारतीय अर्थव्यवस्था झपाट्याने विकसीत होत असून सेवा क्षेत्राची बाजारपेठ म्हणून भारतीय ब्रँड जागतिक स्तरावर प्रस्थापीत आहेत. अशा परिस्थितीत भारतीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्या आपली कार्यालये थाटण्याकरीता शहरी क्षेत्र व सेझ क्षेत्रांची निवड करीत असल्यामुळे पायाभूत नागरी सुविधा सुधारणे अपरिहार्य ठरते.

अभ्यास विषयाची निवड :

नांदेड व परभणी या दोन्ही जिल्ह्यांना आतापर्यंत केंद्रामध्ये मंत्रिमंडळात अनेक महत्त्वाची खाती मिळून देखील या जिल्ह्यांचा पाहिजे तसा व पाहिजे तेवढया पायाभूत सुविधा उपलब्ध होऊ शकल्या नाही. नांदेड जिल्ह्याचे आतापर्यंत केंद्रामध्ये गृहमंत्री व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद मिळून देखील मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचा विकास झाला नाही.

त्याचे कारण अभ्यासण्यासाठी नांदेड व परभणी जिल्ह्यांच्या विकासात पायाभूत संरचनेचे योगदान कशा प्रकारचे आहे व ते कसे असावे हे अभ्यासण्यासाठी प्रस्तुत 'नांदेड व परभणी जिल्ह्यांतील पायाभूत (आधारभूत) सुविधांच्या उपलब्धतेचा तुलनात्मक अभ्यास' या विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

आर्थिक घटक : (१) सिंचन (२) वीज (३) वाहतूक (रस्ते व रेल्वे)
(४) अधिकोषण (५) विपणन

सामाजिक घटक : (१) शिक्षण (२) आरोग्य (३) पेयजल पुरवठा

अभ्यासाची उद्दिष्ट्ये :

१. नांदेड व परभणी जिल्हयांतील पायाभूत संरचनेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

२. नांदेड व परभणी जिल्हयांतील सिंचन सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. नांदेड व परभणी जिल्हयांतील विद्युत् पुरवठा सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

४. नांदेड व परभणी जिल्हयांतील वाहतूक सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

५. नांदेड व परभणी जिल्हयांतील अधिकोषण सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

६. नांदेड व परभणी जिल्हयांतील विपणन सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

७. नांदेड व परभणी जिल्हयांतील शिक्षण सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

८. नांदेड व परभणी जिल्हयांतील आरोग्य विषयक सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

९. नांदेड व परभणी जिल्हयांतील पेयजल पुरवठा सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

अभ्यासाची गृहीतकृत्ये :

१. नांदेड व परभणी जिल्हयांतील पायाभूत संरचनेचा विकास झालेला नाही.

२. नांदेड व परभणी जिल्हयांतील सिंचन सुविधांचा पुरेसा विकास झालेला नाही.

३. नांदेड व परभणी जिल्हयांतील विद्युत् पुरवठा सुविधांचा विकास झालेला नाही.

४. नांदेड व परभणी जिल्हयांतील वाहतूक सुविधांचा विकास झालेला नाही.

५. नांदेड व परभणी जिल्हयांतील अधिकोषण सुविधांचा विकास झालेला नाही.

६. नांदेड व परभणी जिल्हयांतील विपणन सुविधांचा विकास झालेला नाही.

७. नांदेड व परभणी जिल्हयांतील शिक्षण सुविधांचा विकास झालेला नाही.

८. नांदेड व परभणी जिल्हयांतील आरोग्य विषयक सुविधांचा विकास झालेला नाही.

९. नांदेड व परभणी जिल्हयांतील पेयजल पुरवठा सुविधांचा विकास झालेला नाही.

संशोधन पद्धती :

हा अभ्यास प्रामुख्याने द्वितीयक साधन समुग्रीवर आधारलेला आहे. अभ्यासासाठी सन २०१०-११ ते २०२२-२३ य कलावधीची निवड करण्यात आली आहे. अभ्यासासाठी अभिवृद्धी दर, सहसंबंध गुणक, प्रमाण विचलन व विचरण गुणक इ. सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल.

संशोधनाच्या मर्यादा :

सदरील संशोधनात अभ्यासासाठी घेण्यात आलेल्या विविध निकषांच्या संदर्भातील प्राप्त निष्कर्ष पायाभूत संकल्पनेत समाविष्ट नसलेल्या इतर निकषांच्या संदर्भात तंतोतंतपणे लागू पडतीलच असे नाही.

प्रकारणांची रूपरेषा :

प्रस्तुत शोध प्रबंध एकूण सहा प्रकरणात विभागण्यातयेईल. सदरील प्रकरणाची रूपरेषा खालीलप्रमाणे आहे.

प्रकरण पहिले

हे प्रकरण प्रस्तावनेशी निगडीत असून यात भारत , महाराष्ट्र, मराठवाडयातील आधारभूत संरचनेचा विकास , आधारभूत संरचनेची संकल्पना , आर्थिक विकासात आधारभूत संरचनेचे महत्त्व , अभ्यास विषयाचे महत्त्व , अभ्यास विषयाची निवड, उद्दिष्टये, गृहितकृत्ये, संशोधन पद्धती, संशोधनाच्या मर्यादा व प्रकरणाची रुपरेषा इत्यादींचा समावेश करण्यात येईल.

प्रकरण दुसरे :

ह्या प्रकरणात संशोधनाशी निगडीत असलेल्या संशोधन साहित्यांशी संबंधित असून यात अभ्यास विषयाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण असलेल्या निकषांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे :

ह्या प्रकरणात नांदेड व परभणी जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करण्यात येईल. यात नांदेड व परभणी जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ, पर्वतरांगा, मृदा,

नद्या, पर्जन्यमान, लोकसंख्या, पीकरचना, सिंचन, कृषी अवजारे व यंत्रसामुग्री, अधिकोषण, विपणन, औद्योगिक विकास, व्यापार इत्यादींची चर्चा करण्यात येईल.

प्रकरण चौथे :

ह्या प्रकरणात नांदेड व परभणी जिल्ह्यातील आर्थिक पायाभूत सुविधेचे विश्लेषण करण्यात येईल. यामध्ये सिंचन, वीज वाहतूक (रस्ते व रेल्वे), अधिकोषण, विपणन या पाच पायाभूत सुविधांचा विकासाचे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण पाचवे :

सदरील प्रकरणात नांदेड व परभणी जिल्ह्यातील सामाजिक पायाभूत संरचनेचे विश्लेषण करण्यात येईल. यामध्ये शिक्षण, आरोग्य, पेयजल पुरवठा या तीन पायाभूत सुविधांचे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण सहावे :

ह्या प्रकरणामध्ये निष्कर्ष आणि शिफारशी करण्यात येतील.

संदर्भ ग्रन्थ सूची

1. Datt Ruddar & Sundharam K.P.M., (2004), Indian Economy, S. Chand & Co. Ltd., new Delhi.

2. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2022 जिल्हा: नांदेड.

3. Indian Economic Survey 2013-14, Union ministry of Economics, Govt. of India, New Delhi.

4. Development of Marathwada A Perspective, (1999), Swami Ramanand Teerth Research Institute, Aurangabad.

5. दास्ताने संतोष, (२०१२), महाराष्ट्र २०१२, नितीन प्रकाशन, पुणे.

6. पुरोहित वसुधा, (२००८), भारतीय अर्थव्यवस्था,विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

7. जाधव (संपा), (२०१०), महाराष्ट्र वार्षिक, द यूनिक अकॅडमी, पुणे.

8. उद्योजक, दिवाळी (२०११), महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद.

9. देशपांडे विनायक (संपा), (२००८), अर्थसंवाद, जाने - मार्च २००८, खंड ३१, अंक -४ .

10. बोधनकर सुधीर, (२०११), सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर.

11. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2022 जिल्हा: परभणी.

मार्गदर्शक	संशोधक
डॉ. विजय एन. भोपाळे	अश्विनी दत्ताहारी कदम
प्रोफेसर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख	एम. ए. (अर्थशास्त्र)

एस.एस.एस. पवार महाविद्यालय, पुर्णा (जं)

ता. पूर्णा जि. परभणी.